SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists

Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Acceredited by NAAAC (2021)
With CGPA3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ No 988 [illegible] दि. 14 SEP 2023

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत अनुदानित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:- राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई यांनी अपील क्रमांक १८८९/२०२१,१८९०/२०२१, १८९१/२०२१ व १९११/२०२१ मध्ये दिनांक २७.६.२०२३ चे आदेशाचे अनुपालन करणेबाबत....

संदर्भ:- मा.प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे जा.क्र. एनजीसी/मा.अ./राज्य.मा.आ./मवि-३/२०२३/९७४१, दि. ११ सप्टेंबर,२०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१)(ख) अन्वये अनुदानित महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणाऱ्या अनुदानाचे विवरण वरील अनुदानाचे विनियोग, त्याबाबत** सादर केलेले उपयोगिता **प्रमाणपत्र अथवा अहवाल या संबंधातील माहिती** संबंधित शिक्षण संस्थांनी स्वयंस्फूर्तीने संस्थेच्या/महाविद्यालयांच्या अधिकृत संकेतस्थळावर सर्वच नागरिकांसाठी प्रकाशित करावी.

सबब, सोबत जोडलेले पत्र अवलोकनी घेवून उपरोक्तप्रमाणे **सर्व संलग्नीत अनुदानित महाविद्यालयांनी आपले स्तरावर तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सॉफ्ट कॉपीमध्ये या कार्यालयास सादर करावा.**

आदेशान्वये

श्री.विलास एस. सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**सोबत-** वरीलप्रमाणे.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

pvc office <pvcoffice@unishivaji.ac.in>

# Fwd: Rajya Mahiti Aayog - UGC grant - paripatrak

**Registrar Shivaji University, Kolhapur** <registrar@unishivaji.ac.in> Tue, Sep 12, 2023 at 4:52 PM
To: pvc office <pvcoffice@unishivaji.ac.in>, "Affiliation Section T2 Shivaji University, Kolhapur" <affiliation.t2@unishivaji.ac.in>, "Shri. V. S. Soyam." <vss.dyr@unishivaji.ac.in>

---------- Forwarded message ---------
From: **MAVI Shakha DHEPUNE** <mavi.dhepune@nic.in>
Date: Tue, Sep 12, 2023 at 4:23 PM
Subject: Rajya Mahiti Aayog - UGC grant - paripatrak
To: Gondwana University <registrar.gondwanauniversity@gmail.com>, Mumbai university <registrar@fort.mu.ac.in>, pune university <regis@unipune.ac.in>, SNDT University <registrar@sndt.ac.in>, Jalgaon University <registrar@nmu.ac.in>, Kolhapur University <registrar@unishivaji.ac.in>, Solapur University <registrar@sus.ac.in>, Aurangabad University <registrar@bamu.ac.in>, Amarati University <registrar@sgbau.ac.in>, registrar <registrar@sgbau.ac.in.in>, Raju E Hiwase <registrar@nagpuruniversity.nic.in>, registrar <registrar@kksu.org>

**Shivaji University, Kolhapur**
**Pro-Vice-Chancellor Office**
**Date :-** 14/09/2023
**Inward No :** 508
**To Whom :** Affi. T-2

आपला विश्वासू,

वरिष्ठ प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय ( उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१

*This email and any files transmitted with it are confidential and intended solely for the use of the individual or entity to whom they are addressed. If you have received this email in error please notify the system manager. Please note that any views or opinions presented in this email are solely those of the author and do not necessarily represent those of the Shivaji University. Finally, the recipient should check this email and any attachments for the presence of viruses. Shivaji University accepts no liability for any damage caused by any virus transmitted by this email.*

**Rajya Mahiti Aayog - ugc- paripatrak 11.9.2023_0001.pdf**
9622K

Aff. T-2
13/9/2023
13/9

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mav.dhepune@gov.in

फोन नं. ०२०/२६१२२२३१, २६०५८५३२, २६१२०६२७, २६१२४६३९

क्र. एनजीसी/मा.अ./राज्य मा.आ./अपील/२०२३ ९७८९ दिनांक - ०१.०९.२०२३

11 SEP 2023

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,

२. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य

**विषय :- राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई यांनी अपील क्रमांक १८८९/२०२१, १८९०/२०२१, १८९१/२०२१ व १९११/२०२१ मधे दिनांक २७.६.२०२३ चे आदेशाचे अनुपालन करणेबाबत**

**संदर्भ :- महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे जावक क्रमांक ४७७४ दिनांक २०.८.२०२३**

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित आदेशाची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. उपरोक्त अपिलामधील अपिलार्थी श्री विजयकुमार नंदलालजी शर्मा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(१) नुसार जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज करुन त्यांनी माहिती अधिकारात नमूद केल्यानुसार वेगवेगळ्या कालावधीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वर्धा येथील बजाज विज्ञान महाविद्यालयाला प्राप्त विविध अनुदानाच्या विवरणासह माहिती देण्यात यावी यासाठी माहिती मागितलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी प्रतिसादामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग ही केंद्रीय संस्था असून विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयास दिलेले अनुदान नियमानुसार आहे की नाही किंवा महाविद्यालयाने अनुदानाचा नियमानुसार खर्च केला किंवा नाही हे तपासण्याचा अधिकार फक्त विद्यापीठ अनुदान आयोगास असल्याने तसेच मागितलेल्या माहितीचा कोणताही व्यापक जनहिताशी संबंध नसल्याने माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थी कळविले. अपिलार्थी यांनी कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून पुढीलप्रमाणे आदेश दिले. "Principal/PIO has rightly denied the information since the appellant has failed to establish any larger public interest for the disclosure of information sought by him. On the other hand, it is clearly established that the appellant is pursuing a personal agenda of harassing his former employer management with some ulterior motives which amounts to the misuse of RTI Act. In such cases, giving information is tantamount to encouraging the misuse of RTI Act as per the decisions of the Central Information Commission. In view of the above, the appeal is dismissed."

तदनंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही अपील अर्ज मंजूर करून माहिती पुरविण्याचा आदेश पारित न केल्यामुळे असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपीलावर दिनांक २७.६.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर अपिलाच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, तसेच संचालक वैद्यकीय शिक्षण विभाग, तसेच सर्व सहसंचालक उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यातील सर्व विद्यापीठ तसेच सर्व संलग्न महाविद्यालय यांना खालीलप्रमाणे कळविण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

सर्वच अनुदान विद्यालयातील विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणाऱ्या अनुदानाचे विवरण, सदर अनुदानाचे विनियोग त्याबाबत सादर केलेले उपयोगिता प्रमाणपत्र अथवा अहवाल या संबधातील माहिती अशा सर्व शिक्षण संस्थेने संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४(१) (ख) प्रमाणे स्वयंस्फूर्तीने सर्वच नागरिकांसाठी प्रकाशित करावी.

सदर आदेशाचे अनुपालन होण्यासाठी कळविण्यात येते की, आपण आपल्या विभागातील सर्वच अनुदान विद्यालयातील विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणाऱ्या अनुदानाचे विवरण, सदर अनुदानाचे विनियोग त्याबाबत सादर केलेले उपयोगिता प्रमाणपत्र अथवा अहवाल या संबधातील माहिती अशा सर्व शिक्षण संस्थेने संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४(१) (ख) प्रमाणे स्वयंस्फूर्तीने सर्वच नागरिकांसाठी प्रकाशित करावी.

तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १९.०३.२०१९ व शासन निर्णय दिनांक १६.०२.२०२३ मधील तरतूदी आपल्या अधिपत्याखालील सर्व संलग्न महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

- सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४(१) (क) व (ख) नुसार अभिलेखाचे संगणकीकरण करावे.
- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींवरील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी प्रसिद्ध करावी व दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करावी.
- दिनांक १ जानेवारी व १ जुलै असे वर्षातून किमान दोन वेळा संकेत स्थळावरील (website) सदर माहिती अद्ययावत केली जावी.
- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींव्यतिरिक्त ज्या बाबींची माहिती, माहिती अधिकारांतर्गत मोठ्या प्रमाणात मागितली जात त्या बाबींची माहिती स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करावी.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले द्वितीय अपील

अपील क्रमांक : १८८९/२०२१, १८९०/२०२१, १८९१/२०२१ व १९११/२०२१

अपिलार्थी: श्री. विजयकुमार नंदलालजी राठी

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा, ता.जि. वर्धा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सभापती, (शिक्षा मंडळ वर्धा),
बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा, ता.जि. वर्धा

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
गो.से. वाणिज्य महाविद्यालय, जमनालाल बजाज मार्ग, वर्धा, ता.जि. वर्धा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सभापती, (शिक्षा मंडळ वर्धा),
गो.से. वाणिज्य महाविद्यालय जमनालाल बजाज मार्ग, वर्धा, ता.जि. वर्धा

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२३

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय अधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.११.२०२० | २४.१२.२०२० | ०१.०१.२०२१ | २६.०३.२०२१ |
| १५.११.२०२० | २४.१२.२०२० | ०२.०१.२०२१ | २६.०३.२०२१ |
| ११.११.२०२० | २४.१२.२०२० | ०७.०१.२०२१ | २६.०३.२०२१ |
| १८.११.२०२० | २४.१२.२०२० | ०५.०१.२०२१ | २६.०३.२०२१ |

अपील क्रमांक : १८८९/२०२१ अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४.११.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वर्धा च्या बजाज विज्ञान महाविद्यालयाला प्राप्त विविध अनुदानाच्या विवरणासह माहिती देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस खालीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

"विद्यापीठ अनुदान आयोग ही केंद्रीय संस्था असून देशातील उच्च शिक्षण देणाऱ्या या संस्थांना विविध कारणास्तव अनुदाने विविध योजनांतर्गत नियमानुसार देत असते. तसेच नियमानुसार देण्यात आलेली अनुदाने व त्यांचा खर्च तपासणारी विद्यापीठ अनुदान आयोग ही जबाबदार संस्था आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयास दिलेले अनुदान नियमानुसार आहे की नाही किंवा महाविद्यालयाने अनुदानाचा नियमानुसार खर्च केला किंवा नाही हे तपासण्याचा अधिकार फक्त विद्यापीठ अनुदान आयोगालाच आहे व त्यासंबंधीचे उपयोगीता प्रमाणपत्रे विद्यापीठ अनुदान आयोगास वेळोवेळी पाठवली गेली आहेत. तसेच आपण मागीतलेल्या माहितीचा कोणत्याही व्यापक जनहिताशी संबंध आहे असे आमचे मत बनत नाही त्यामुळे वरील माहिती आपणास देता येत नाही, असे अपिलार्थी कळविले."

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०१.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही " असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २६.०२.२०२१ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केले.

"Principal/PIO has rightly denied the information since the appellant has failed to establish any larger public interest for the disclosure of information sougth by him. on the other hand, if it clearly established that the appellant is pursuing a personal agenda of harassing his former employer-management with some ulterior motives which amounts to the misuse of RTI Act. In such cases, giving information is tantamount to encouraging the misuse of RTI Act as per the decisions of the Central Information Commission. In view of the above, the appeal is dismissed."

अपील क्रमांक : १८९०/२०२१ अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५.११.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " २०१३-१४ ते २०१९-२० या कालावधीत कर्मवीर बजाज विज्ञान महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त सर्व अनुदानाच्या खर्चाची व अदा केलेल्या सर्व बिलाची व्हाऊचर व पावतीसह माहिती देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस खालीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

"विद्यापीठ अनुदान आयोग ही केंद्रीय संस्था असून देशातील उच्च शिक्षण देणाऱ्या या संस्थांना विविध कारणास्तव अनुदाने विविध योजनांतर्गत नियमानुसार देत असते. तसेच नियमानुसार देण्यात आलेली अनुदाने व त्यांचा खर्च तपासणारी विद्यापीठ अनुदान आयोग ही जबाबदार संस्था आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयास दिलेले अनुदान नियमानुसार आहे की नाही किंवा महाविद्यालयाने अनुदानाचा नियमानुसार खर्च केला किंवा नाही हे तपासण्याचा अधिकार फक्त विद्यापीठ अनुदान आयोगालाच आहे व त्यासंबंधीचे उपयोगीता प्रमाणपत्रे विद्यापीठ अनुदान आयोगास वेळोवेळी पाठवली गेली आहेत. तसेच आपण मागीतलेल्या माहितीचा कोणत्याही व्यापक जनहिताशी संबंध आहे असे आमचे मत बनत नाही त्यामुळे वरील माहिती आपणास देता येत नाही, असे अपिलार्थी कळविले."

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०२.०१.२०२१ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २६.०३.२०२१ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केले.

"Principal/PIO has rightly denied the information since the appellant has failed to establish any larger public interest for the disclosure of information sougth by him. On the other hand, if it clearly established that the appellant is pursuing a personal agenda of harassing his former employer-management with some ulterior motives which amounts to the misuse of RTI Act. In such cases, giving information is tantamount to encouraging the misuse of RTI Act as per the decisions of the Central Information Commission. In view of the above, the appeal is dismissed."

अपील क्रमांक : १८९१/२०२१ अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१.११.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " २००८-०९ ते २०१९-२० या कालावधीत वर्षाच्या जी.से. वाणिज्य महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त सर्व अनुदानाच्या खर्चाची व अदा केलेल्या सर्व बिलाची व्हाऊचर व पावतीसह माहिती देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस खालीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

" विद्यापीठ अनुदान आयोग ही केंद्रीय संस्था असून देशातील उच्च शिक्षण देणाऱ्या या संस्थांना विविध कारणास्तव अनुदाने विविध योजनांअंतर्गत नियमानुसारच देत असते. असेच नियमानुसार देण्यात आलेली अनुदाने व त्याचा खर्च तपासणारी विद्यापीठ अनुदान आयोग ही जबाबदार संस्था आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयास दिलेले अनुदान नियमानुसार आहे की नाही किंवा महाविद्यालयाने अनुदानाचा नियमानुसार खर्च केला किंवा नाही हे तपासण्याचा अधिकार फक्त विद्यापीठ अनुदान आयोगासच आहे व त्यासंबंधीचे उपयोगीता प्रमाणपत्रे विद्यापीठ अनुदान आयोगास वेळोवेळी पाठवली गेली आहेत. तसेच आपण मागितलेल्या माहितीचा कोणत्याही व्यापक जनहिताशी संबंध आहे असे आमचे मत बनत नाही त्यामुळे वरील माहिती आपणास देता येत नाही. असे अपिलार्थी कळविले."

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०१.२०२१ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २६.०३.२०२१ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केले.

"Principal/PIO has rightly denied the information since the appellant has failed to establish any larger public interest for the disclosure of information sougth by him, on the other hand, if it clearly established that the appellant is pursuing a personal agenda of harassing his former employer-management with some ulterior motives which amounts to the misuse of RTI Act,

In such cases, giving information is tantamount to encouraging the misuse of RTI Act as per the decisions of the Central Information Commission. In view of the above, the appeal is dismissed."

**अपील क्रमांक : १९११/२०२१** अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक **१८.११.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " २००९-१० ते २०१९-२० या कालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वर्षाच्या गो.से.वाणिज्य महाविद्यालयाला प्राप्त विविध अनुदानाच्या विवरणासह माहिती देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस खालीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे.

"विद्यापीठ अनुदान आयोग ही केंद्रीय संस्था असून देशातील उच्च शिक्षण देणाऱ्या या संस्थांना विविध कारणास्तव अनुदाने विविध योजनांअंतर्गत नियमानुसारच देत असते. तसेच नियमानुसार देण्यात आलेली अनुदाने व त्याचा खर्च तपासणारी विद्यापीठ अनुदान आयोग ही जबाबदार संस्था आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयास दिलेले अनुदान नियमानुसार आहे की नाही किंवा महाविद्यालयाने अनुदानाचा नियमानुसार खर्च केला किंवा नाही हे तपासण्याचा अधिकार फक्त विद्यापीठ अनुदान आयोगासच आहे व त्यासंबंधीचे उपयोगीता प्रमाणपत्रे विद्यापीठ अनुदान आयोगास वेळोवेळी पाठवली गेली आहेत. तसेच आपण मागितलेल्या माहितीचा कोणत्याही व्यापक जनहिताशी संबंध आहे असे आमचे मत बनत नाही त्यामुळे वरील माहिती आपणास देता येत नाही, असे अपिलार्थी कळविले."

त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक **०५.०१.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २६.०३.२०२१ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत केले.

"Principal/PIO has rightly denied the information since the appellant has failed to establish any larger public interest for the disclosure of information sougth by him, on the other hand, if it clearly established that the appellant is pursuing a personal agenda of harassing his former employer-management with some ulterior motives which amounts to the misuse of RTI Act. In such cases, giving information is tantamount to encouraging the misuse of RTI Act as per the decisions of the Central Information Commission. In view of the above, the appeal is dismissed."

तदनंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक **०७.०९.२०२१ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांनीही अपील अर्ज मंजूर करुन माहिती पुरविण्याचा आदेश पारित न केल्यामुळे" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपीलावर आज दिनांक २७.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बजाज विज्ञान

महाविद्यालय वर्धा डॉ. प्रदिप टेकाडे तर्फे सहाय्यक जन माहिती अधिकारी डॉ. व्ही. जे. शर्मा उपस्थित आहेत. व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गो.से. वाणिज्य महाविद्यालय वर्धा, श्रीमती अरुंधती निनावे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे अरुंधती निनावे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान केलेले युक्तीवादाचा पुनरुच्चार केला असुन दिनांक १४.११.२०२०, दिनांक १५.११.२०२०, दिनांक १८.११.२०२० व दिनांक १३.११.२०२० च्या अर्जानुसार सर्वच संबधीत कागदपत्राच्या प्रती पुरविण्याबाबत आदेश देण्याची विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या लेखी युक्तीवादात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या त्यांच्या आदेशाचे पुनरुच्चार केले असुन अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जात हे माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग असल्याबाबत मा. केंद्रीय माहिती आयोगाने पारित केलेल्या H.K.Bansal Vs DOT या प्रकरणात दिनांक ११.१०.२०१६ रोजी आदेशाचा दाखला दिला आहे.

याशिवाय अपिलार्थी यांनी संस्थेचे अध्यक्ष तथा सभापती श्री. संजय भार्गव, वर्धा, यांचेविरुध्द देखील वर्तमानपत्रात अतिशय अपमानास्पद बातम्या छापुन आणल्या बाबत कागदपत्रे सादर केलेले आहे. सादर कागदपत्रांचा सारासार विचार केला असता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे बजाज विज्ञान महाविद्यालय तसेच गो.से. वाणिज्य महाविद्यालय यांना प्राप्त विविध अनुदान या संबधीत सार्वजनिक निधी हा एका अनुदान महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला असुन यासील कलम ४ (१) अन्वये संबधीत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असणे अपेक्षित असुन अपिलार्थी यांनी संस्थेच्या विरुध्द केलेला आरोप त्यावर आयोगाने भाष्य करणे संयुक्तीक होणार नाही. मात्र त्याअनुषंगाने मागीतलेली माहिती ही विद्यापीठ अनुदान आयोग यांना शिक्षा मंडळ वर्धाद्वारे बजाज महाविद्यालय व गो.से. वाणिज्य महाविद्यालय यांना प्रदान अनुदानाच्या संबधीत असुन वरील सर्व ही माहिती अर्जाच्या अनुषंगाने कलम २ (च) प्रमाणे प्राप्त अनुदान व त्या अनुदानाचे विनीयोगाबाबत महाविद्यालयाचे विद्यापीठ अनुदान आयोगाने सादर केलेले विवरण अथवा उपयोगिता प्रमाणपत्र अहवाल असुन महाविद्यालयातील अभिलेखावर यासंबंधीतील उपलब्ध असलेली माहिती कलम २ (च) प्रमाणे अपिलार्थी यांना विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह वरील अपील मंजुर करण्यात येत आहे.

सर्वच अनुदानित विद्यालयातील विद्यापीठ अनुदान आयोगाकडुन मिळणाऱ्या अनुदानाचे विवरण वरील अनुदानाचे विनियोग त्याबाबत सादर केलेले उपयोगिता प्रमाणपत्र अथवा अहवाल या संबंधीतील माहिती अशा सर्व शिक्षण संस्थेने संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ४ (१) (ख) प्रमाणे स्वयंस्फुर्तीने सर्वच नागरीकांसाठी प्रकाशित करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता, अनुदानित महाविद्यालयांना अशा प्रकारच्या सुचना देण्याची विनंती ही विद्यापीठ अनुदान आयोगांना करण्यात येत आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच संचालक, वैधकिय शिक्षण विभाग यांना याबाबतील योग्य त्या सुचना देवुन सर्व सहसंचालक उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य यातील सर्व विद्यापीठ व तसेच सर्व संलग्न महाविद्यालय यांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडुन प्राप्त निधी त्यातील माहिती स्वयंस्फुर्तीने उघड करण्यासंदर्भात निर्देश देण्याचे सुचनेसह वरील सर्व ही अपील अर्ज मान्य करण्यात येत आहे. या आदेशाची प्रत संचालक, उच्च शिक्षण, पुणे, सहसंचालक, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभाग नागपूर, सचिव विद्यापीठ

अनुदान आयोग, तसेच महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठ च्या कुलसचिव यांना अग्रेषित करण्यात येवुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २७.०६.२०२३

जावक क्रमांक 4774 दिनांक 10 AUG 2023

प्रत
१. संचालक, उच्च शिक्षण, पुणे
२. सहसंचालक, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभाग नागपूर.
३. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, तसेच महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठाचे कुलसचिव यांना माहितीस्तव अग्रेषित